## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/मुफसल /का.अ. /सर्वसाधारण बदल्या-२०१७/८१/२०१७ मुंबई , दिनांक : १९ /०५/२०१७

# -: आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम -२००५ अन्वये, आणि शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआर्एन्-०३११/१३३५/प्र.क्र.२२९/पोल-५ब, दिनांक २९/०३/२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षकांनी सध्याच्या कार्यालयात ३ वर्षे सेवा पुर्ण केल्यामुळे त्यांची बदली त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | कार्यालय अधीक्षकांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री योगीराज महादू भूरकूड | समादेशक, रारापोबल, गट क्र ७ दौंड | अपर पोलीस महासंचालक, गुअवि, पुणे |
| २ | श्री दत्तात्रय प्रभाकर अंबेकर | समादेशक, रारापोबल, गट क्र १२, हिंगोली | समादेशक, रारापोबल, गट क्र ३, जालना |

२. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सूचनांचे काटेकोर पालन करावे :-

- बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी कार्यालय अधीक्षकांची हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कार्यालय अधीक्षकांना बदली ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.
- बदली झालेल्या व कार्यमुक्त केलेल्या कार्यालय अधीक्षकांना संबंधित घटक प्रमुखांनी विनाविलंब रुजू करुन घ्यावे. तसेच, ते हजर झाल्याचा दिनांक ह्या कार्यालयास कळवावा. एखाद्या कार्यालय अधीक्षकास रुजू करुन न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षाकाळ ठरवून काम न देता भत्ते देण्याचा प्रश्न उद्‌भवल्यास संबंधित घटक प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.
- बदलीच्या आदेशांत बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कार्यालय अधीक्षकाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे बाह्य दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कार्यालय अधीक्षक शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
- बदली झालेल्या कार्यालय अधीक्षकांनी त्यांची पदस्थापना केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे.
- बदली आदेशानंतर जे कार्यालय अधीक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

३. सदरचे आदेश पोलीस महासंचालकांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ७ दौंड / गट क्र १२, हिंगोली. / गट क्र ३, जालना

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.